MHGA070003572026

**अहेरी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अहेरी**
**श्री. शाहिद साजीदुज्जामॉ एम.एच. यांच्या न्यायालयांत**

संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२००/२०२६
सरकार —वि.— संदिप जगन्नाथ तलांडे
**निशाणी —३**

| आरोपीचा आशय व तपशील | | |
|---|---|---|
| १. | **गुन्हा घडला तारीख** | दिनांक २८.०२.२०२६ रोजी, वेळ १६.५५ वाजताच्या दरम्यान, गटटा नाका, एटापल्ली, मौजा— एटापल्ली, तह. एटापल्ली, जि. गडचिरोली |
| २. | **खबर दिल्याची तारीख** | दिनांक २८.०२.२०२६ |
| ३. | **खबर देणाऱ्याचे नांव** | पो.हवा. श्री. संजय संपत मसराम पोलीस स्टेशन, एटापल्ली, तालुका— एटापल्ली, जिल्हा—गडचिरोली. |
| ४. | **आरोपीचे नांव** | **संदिप जगन्नाथ तलांडे,** वय २८ वर्षे, व्यवसाय — चालक, राह.—विसामुंडी, तालुका भामरागड, जिल्हा—गडचिरोली. |
| ५. | **आरोपीत गुन्हे** | |
| | ज्याअर्थी, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी, तुम्ही उपरोक्त ठिकाणी तुमच्या ताब्यातील दुचाकी वाहन हे नागमोडी सारखी चालवित येत असतांना दिसून आले. वरील ठिकाणी आपण मद्यधुंद अवस्थेत दिसत असल्याने तसेच आपल्या तोंडाचा आंबट व उग्र वास येत असल्याने आपण दारू पिवून असल्याचे अभिप्राय दिले. त्याअर्थी तुम्ही, **मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम १८४, १८५** प्रमाणे गुन्हा केला असा तुमच्यावर आरोप आहे. | |
| **तारीख:** १२.०३.२०२६ | | **समक्ष** |

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2026.03.13 11:13:45 +0530

**(शाहिद साजीदुज्जामॉ एम.एच.)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, अहेरी

| | **आरोपीचे प्रतिकथन/कबुली** |
|---|---|
| **प्रश्न क्र.१** | तुम्हाला दोषारोपांचा आशय समजला काय? |
| **उत्तर** | होय |
| **प्रश्न क्र.२** | तुम्हाला पोलीस कागदपत्रांच्या नकला मिळाल्यांत काय? |
| **उत्तर** | होय |
| **प्रश्न क्र.३** | तुम्हाला विधी सेवा केंद्राकडुन विधीज्ञ सेवा हवी आहे काय? |
| **उत्तर** | नाही |

| | |
|---|---|
| **प्रश्न क्र.४** | तुम्हाला आरोपीत गुन्हे कबुल आहेत काय? |
| **उत्तर** | होय मला गुन्हा कबुल आहे |
| **तारीख:** १२.०३.२०२६ | **समक्ष** |
| ............................<br>आरोपीची सही/अंगठा | Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID Date: 2026.03.13 11:13:50 +0530<br>**शाहिद साजीदुज्जामॉ एम.एच.**<br>न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, अहेरी |

## न्यायनिर्णय/आदेश

(आज तारीख १२.०३.२०२६ रोजी पारित)

१. या खटल्यातील आरोपी आज हजर असुन त्यांना मी उपरोक्त गुन्ह्याचा आशय (**निशाणी ०३**) स्पष्टपणे मराठीत समजावुन सांगितला आहे.

२. आरोपीने ठामपणे व स्पष्ट शब्दांत त्यांचेवरील आरोप मान्य केले आहे. तशी पुरसिस त्यांनी दाखल केली असुन ती निशाणी ०२ ला आहे. आरोपी कुठल्याही अगर कोणाच्याही दबावाविना गुन्हा कबुल करीत आहे याची मी खात्री केली आहे.

३. सबब, मी आरोपीचे गुन्ह्याबाबत कबुलीचे प्रतिकथन स्विकारुन आरोपीला मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १८४ व १८५ प्रमाणे दंडनिय कलमांसाठी दोषी मानत आहे.

४. सदर कलम १८४ मोटार वाहन कायदा या गुन्ह्याबाबत रुपये २,०००/— आणि कलम १८५ मोटार वाहन कायदा या गुन्हयाबाबत रूपये १०,०००/— द्रव्यदंड निर्धारित केलेला आहे. आरोपीने केलेल्या कथनांचा विचार करता आणि कमाल शिक्षेची मर्यादा पाहता, माझ्या मते, पुढील आदेश यथायोग्य आहे.

### आदेश

१) आरोपी **संदिप जगन्नाथ तलांडे,** यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ नुसार मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम १८४ व १८५ प्रमाणे दंडनिय गुन्ह्यासाठी दोषी धरण्यांत येत आहे.

२) आरोपीने कलम १८४ मोटार वाहन कायदा या गुन्ह्याबाबत रुपये २,०००/— आणि कलम १८५ मोटार वाहन कायदा या गुन्हयाबाबत रूपये १०,०००/— प्रमाणे **असे एकूण १२,०००/— (अक्षरी बारा हजार रूपये मात्र) इतका द्रव्यदंड अदा करावा,** अशी शिक्षा त्यांना फर्माविण्यात येत आहे. दंड न भरल्यास आरोपीने दहा दिवस साधी कैद भोगावी असेही फर्माविण्यात येत आहे.

३) प्रकरण संपले.

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2026.03.13
11:13:54 +0530

तारीख : १२.०३.२०२६

**(शाहिद साजीदुज्जामॉ एम.एच.)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, अहेरी